**<u>प्रतिवादी तर्फे उलटतपास – श्री. ए. जी. देशपांडे वकील.</u>**

**६.** मी सहाय्यक दुय्यम निबंधक, वर्ग–२ करवीर क्र.१ कार्यालयात वरिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत आहे. मी सादर केलेल्या नि. क्र.५१ वरील प्रतीवरती मूळ पक्षकार आणि साक्षीदारांच्या स्वाक्ष–या नाहीत. मला नि. क्र.५१ चा मूळ दस्त कोणी नोंदविला होता याबाबत सांगता येणार नाही. मला त्या दस्ताबाबत कोणतीही वैयक्तिक माहिती नाही.

**७.** माझ्याकडे पुर्वीच्या काळीचे मूळ दस्त पक्षकारांना परत दिले जात असल्याबाबतचा कार्यालयीन आदेश नाही. मला नि. क्र.५१ वरील दस्तातील मजकूर आमच्या कार्यालयाच्या मूळ रजिस्टरला कोणाच्या हस्ताक्षरात लिहिण्यात आलेला आहे याबाबत सांगता येणार नाही. मला त्यावरती कोणाची स्वाक्षरी आहे याबाबत सांगता येणार नाही. नि. क्र.५१ च्या दस्तामधील प्रथम पानावरील नरहरी व दुस–या पानावरती लांडे या नावाच्या ठिकाणी खाडाखोड झालेली आहे. मला नोंद घेताना झालेल्या दुरुस्ती बाबत लिहिणा–याने स्वाक्षरी करावी लागते याबाबत माहिती नाही.

**८.** नि. क्र.५१ चा मूळ दस्त कोणाला दिला याची आमच्याकडील मी आज सोबत आणलेल्या रजिस्टरला नोंद नाही. मला मूळ दस्त दिल्यानंतर त्याबाबतची रजिस्टरला स्वाक्षरी घेतली जाते याबाबतची माहिती नाही. आज रोजी मूळ दस्त दिल्यानंतर त्याची रजिस्टरला नोंद घेतली जात आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०३.०२.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.